# मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर न्यायालय
# अंबाजोगाई

कि.दि.अर्ज नं. १२/२०२६

**हिराबाई व इतर विरुध्द निरंक**

**प्रकरण -: बॉम्बे रेग्यूलेशन अक्ट १८२७ ऑफ ८ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणत्र मिळणे बाबत**

## : पुराव्याचे शपथपत्र :

मी **नागनाथ पि. तुकाराम जांभळे,** वय- ३५ वर्षे धंदा- शेती, रा. शिवाजी चौक, बर्दापुर, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील रहिवाशी असुन प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, सदरील अर्जात मी अर्जदार क्र. ३ असुन अर्जदार क्र. १ हि अर्जदार क्र. २ व ३ जन्मदाती आई आहे. अर्जदार नं १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे जन्मदाते वडील मयत नामे **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** हे दि. २७/०८/२०२५ रोजी सतत अजारी असल्यामुळे मयत झालेले आहेत. तसेच मयताची आई नामे गंगाबाई एकनाथ जांभळे ह्या सुमारे १७ वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत नामे **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** यांचे ग्रामपंचायत कार्यालय, बर्दापुर यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र, अर्जदारांचे आधारकार्ड, सोबत जोडले आहे. अर्जदार क्र १ ते ३ यांना शासकीय, निमशासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** यांचे अर्जदार १ ते ३ हेच कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन तसे वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे देण योग्य व न्यायाचे आहे. अर्ज मंजूर करण्यात येवून मयत **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** यांचे अर्जदार नं १ ते ३ हेच कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून तसे प्रमाणपत्र अर्जदारांच्या नांवे देण्यात यावे. करीता मा. न्यायालयाच्या आदेशाप्रामणे

Asst. Supdt. Jt. Civil Court (JD) Ambajogai

जाहिरप्रगट दि. ०७/०२/२०२६ रोजी दै. न्याय टाईम्स या वृत्तमानपत्रात जाहिरनामा देण्यात आलेला असून सदर जाहिरनाम्याच्या अनुषंगाने आजतागायत कोणीही हरकत किंवा उजर दाखल केलेली नाही.

अर्जदारांनी सदरील अर्जात काही महत्वाची कागदपत्र दाखल केलेली असून त्यास निशाणी क्रमांक देण्यात यावा व पुराव्याकामी वाचण्यात यावे. सबब पुराव्याचे शपथपत्र दिले ते खरे व बरोबर आहे असे फक्त.

दि. १२/०३/२०२६ प्रतिज्ञक

**नागनाथ पि. तुकाराम जांभळे**
रा. शिवाजी चौक, बर्दापुर, ता. अंबाजोगाई,
जि. बीड

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, वरील शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्यावर मी आज रोजी वाचुन समजुन उमजून स्वाक्षरी केली आहे असे फक्त

दि. १२/०३/२०२६ प्रतिज्ञक

**नागनाथ पि. तुकाराम जांभळे**
रा. शिवाजी चौक, बर्दापुर, ता. अंबाजोगाई,
जि. बीड

मी प्रतिज्ञकास ओळखतो

**ॲड.एस.के.पठाण**
अंबाजोगाई

शपथपत्र
शपथेवर सत्य निवेदन करतो की,
माझे नांव
यांना लिहिता
हे ओळखतात.

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर
न्यायालय अंबाजोगाई जि. बीड.

कि. दि. अ. क्रं. 12/2026.

हिराबाई जांभळे इतर.

वि.

निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणे
बाबत- 1827, 2 प्रमाणे.

सदरील प्रकरणात अर्जदारातर्फे खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर.

हे की सदरील प्रकरण आजरोजी पुराव्यासाठी ठेवण्यात आलेले आहे.

हे की सदरील प्रकरणात अर्जदार हा महत्वाचे कागदपत्र दाखल करत आहे. ते स्वीकारण्याची परवानगी देणे न्याय व योग्य आहे.

<u>तरी विनंती की.</u>

अर्ज मान्य करावा, महत्वाचे कागदपत्र स्वीकारण्यात यावे.

दि. 12-03-2026

अर्जदार.

मार्फत

ॲड. एस. जी. पडळ

BABLU HASHMI, 7558503036

# LIST OF DOCUMENTS

IN THE COURT OF THE Hon'ble मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय अंबाजोगाई At Ambajogai

नि. कि. अ. क्र. Case No. 12 /2026

हिराबाई जांभळे

Order
Seen &Filed
Sd/-

VERSUS

Exh-9/D

निरंक.

Claim :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत 1827, प्रमाणे.

**Documents Submitted on behalf of applicant.**

| Serial No. | Description of Document | Date of Document | Remarks |
|---|---|---|---|
| 1) | दैनिक व्यापारमित्र परळी वैजनाथ ता. परळी जि. बीड. | 07/02/26 | मुळप्रत |

Place : AMBAJOGAI

Date: 12/3/ 2026

Advocate for_APPLICANT

ADV.

Adv. S.K Pathan

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर
न्यायालय अंबाजोगाई जि. बीड
दि. दि. अ. क्र. 12/2026
हिराबाई वैगरे
वि.
निरंक
प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणेबाबत 1827, 2 प्रमाणे.

## पुरसिस

प्रस्तुत प्रकरणात अर्जदार हा यापुढे कसल्याही प्रकरचा लेखी अथवा तोंडी पुरावा देवू इच्छीत नाही.

करीता सबब पुरसिस सादर

दि. 12/03/2026 पुरसिस देणार

माहित

ॲड. एस. के. पवार